**CNR :- MHSI100002622021**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३३/२०२१ :–

## –: निशाणी १९ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश XXII नियम ४ अन्वये मयत प्रतिवादी विरुद्ध पारीत झालेला दावा (Abatement) चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हा दि.१०.१२.२०२१ रोजी गाव मौजे तळेखोल, ता. दोडामार्ग येथे मयत झाला. प्रतिवादी याचा मृत्यू दाखला तसेच त्याचे वारसाबाबत माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने व कोरोना महामारीच्या पाश्वभुमीमुळे वेळीच प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्याबाबत तजवीज न करता आल्याने प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यास विलंब झाला. सदरचा विलंब माफ होऊन प्रतिवादी विरुद्ध पारीत झालेला सदरचा(Abatement) चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादीचे वारसांतर्फे म्हणणे देण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने दाखल केलेला अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रदीर्घ विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच सदर अर्जासोबत वादीने प्रतिवादी यांचा मृत्यूचा दाखला देखील हजर केलेला नाही. सबब वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह

फेटाळण्याची विनंती प्रतिवादीचे वारसांनी केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकती संदर्भात प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वादीने अर्जात नमुद केलेले कारण समाधानकारक नाही. वादीच्या या कृत्यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायाच्या कारणे प्रतिवादी विरुद्धचा अपशमन (Abatement) आदेश रद्दबातल करण्यासाठी खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करणे मला उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी १९ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी विरुद्ध दावा रद्द/अपशमन (Abatement) आदेश, खर्चाची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) भरल्यानंतर रद्दबातल करण्यात येत आहे.

३. सदरची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADIP BAVKAR
Date: 2023.04.12 15:58:17 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १२.०४.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.